# कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १०९ /२०२५ — दि. ३१/०५/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–**

**ज्याअर्थी, कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत MMRDA अंतर्गत मे. Reliance Astaldi Joint Venture या कपनी कडून मेट्रो ४ चे काम चालू आहे. **कापूरबावडी स्टेशन** येथे PIER CAP, L&T] U गर्डरचे काम करण्यात येणार असुन त्यावेळेस जड अवजड वाहनांना वाहतुकीसाठी ठराविक ठिकाणी मुख्य रस्ता बंद करावा लागणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** **१)** ठाणे घोडबंदर वाहीनीवर काम करताना घोडबंदर रोडच्या दिशेने जाणाऱ्या सर्व जड, अवजड वाहनांना **पिलर क्रमांक ४६ जवळ** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** सदर वाहने ही पिलर क्रमांक ४६ जवळुन विरुध्द दिशेने घोडबंदर ठाणे मुख्य मार्गावरुन जावुन पुढे आर मॉल येथुन डावे बाजुस वळण घेवुन पुढे मुख्य रस्त्याने मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ब)** हलकी वाहने ही पोखरण रोड नं.२ मार्गे ग्लॅडी अल्वारीस रोडने अथवा तत्वज्ञान विद्यापिठ येथुन वसंत विहार सर्कल, काशिनाथ घाणेकर, टिकुजीनीवाडी सर्कल, मानपाडा मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **२)** घोडबंदर ठाणे वाहीनीवर काम करताना ठाण्याच्या दिशेने जाणाऱ्या सर्व जड, अवजड वाहनांना **पिलर क्रमांक ८५ जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** **अ)** घोडबंदर ठाणे वाहीनीवर काम करताना सर्व जड वाहने ही आर मॉल येथुन विरुध्द दिशेने घोडबंदर ठाणे मुख्य मार्गावरुन जावुन पुढे पिलर क्रमांक ४६ येथुन डावे बाजुस वळण घेवुन पुढे मुख्य रस्त्याने इच्छित स्थळी जातील.

**ब)** ह्लकी वाहने ही आर मॉल येथुन छत्रपती शिवाजी महाराज चौक, ढोकाळी मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दिनांक ३१/०५/२०२५ रोजी रात्रौ २३:५५ वा. ते दिनांक ०१/०६/२०२५ रोजी दुपारी १२:०० वा. पावेतो **PIER CAP, L&T] U गर्डरचे टाकण्याचे काम** पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

CamScanner


**प्रत कार्यवाहीसाठी :—**
पोलीस उप आयुक्त, मिरा भाईंदर आयुक्तालय वाहतूक विभाग
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण/पालघर/महामार्ग पोलीस.
चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मिरा भाईंदर
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

<u>प्रत</u> :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.


<u>प्रत</u> :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

<u>प्रत</u> :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.


CamScanner




Scanned with CamScanner
Scanned with CamScanner
CamScanner




Scanned with CamScanner
Scanned with CamScanner
CamScanner




Scanned with CamScanner

CamScanner